मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email :म vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १११ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



'लाल माती'च्या बादशहाचा टेनिसला अलविदा

पान 7

## प्रासंगिक

# भारतीय उद्योगाचे 'आधुनिक दधिची'



भारतीय उद्योग क्षेत्राला जगात टॉपवर नेण्यात आपले जीवन अर्पण करणारे उद्योजक म्हणून त्यांच्या नावाची कीर्ती त्रिखंडात गाजतेय.असे देशाचे उद्योग महानायक रतन टाटा यांचे बुधवारी रात्री महानिर्वाण झाले आणि देशाचे उद्योगक्षेत्र दुःखात बुडाले. टाटांनी ज्या ज्या क्षेत्रात पाऊल टाकले ते क्षेत्र बटू वामनाप्रमाणे पादाक्रांत केले. भारताला जगात पाचवी मोठी आर्थिक महासत्ता बनवण्यात टाटा यांचा सिंहाचा वाटा आहे. लाखो कोटी रुपयांचे साम्राज्य उभे करून एखाद्या तपस्वी योग्याप्रमाणे जीवन जगणारे रतन टाटा हे देशातील युवा उद्योजकांसाठी नेहमीच प्रेरणास्थान ठरले. मोठ्या परिश्रमाने टाटा उद्योगसमूहाला कुबेराच्या साम्राज्याचे रूप देणारे रतन टाटा यांनी कधीही आपल्या कर्तृत्वाचा गर्व अथवा मिथ्या अभिमान बाळगला नाही. त्यातच प्रखर राष्ट्रवादी उद्योजक, कनवाळू आणि गोरगरिबांच्या हालअपेष्टाची जाण ठेवणारा मोठा उद्योजक अशी प्रतिमा टाटा यांनी जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत जपली.त्यांच्या जाण्याने देशातील प्रत्येक घरातील सदस्य हळहळला .असे भाग्य मोजक्याच महान व्यक्तीच्या नशिबी येते हे मात्र खरे.त्यांच्या निधनाने भारतीय उद्योग क्षेत्राची न भरून येणारी हानी झालीय.

अगदी थेट स्वयंपाक घरातील मिठापासून थेट आलिशान कारच्या निर्मितीपर्यंतची सर्व उत्पादने टाटांनी बनवली.सामान्य नागरिकांच्या समस्यांची जाण ठेवत आपल्या उद्योगांची उभारणी करणारे रतन टाटा हे देशाच्या उद्योग क्षेत्राचे 'आधुनिक दधिची' होते असते म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.कारण कधी काळी मंदी आणि उतरती कळा लागलेल्या भारतीय उद्योग क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचे काम टाटा यांनी आपले अफलातून कर्तृत्व आणि जिद्दीने केले. जमशेटजी टाटा यांनी टाटा उद्योगसमूहाचा भक्कम पाया रचला आणि रतन टाटा यांनी त्या साम्राज्यावर सोन्याचा कळस चढवला.कोणताही प्रकल्प हाती घेताना तो यशस्वी करणारच हि जिद्द उद्योग क्षेत्राच्या या 'अनमोल रतन' कडे होती. त्यामुळेच खाद्य उत्पादन क्षेत्र असो कि मोटार वाहन उद्योग असो टाटा हा देश-विदेशात विश्वासाचा ब्रँड बनला.आपल्या ऋषितुल्य वागणुकीने रतन टाटा हे भारतीय उद्योग क्षेत्राचे महर्षी बनले.देशात सरकार कोणाचेही असो राष्ट्रनिर्माण आणि प्रखर देशभक्तीच्या भावनेने टाटा यांनी काम केले.ते करताना गोरगरीब कामगार आणि आपल्या सहकाऱ्यांना रतन टाटा यांनी अगदी आपल्या परिवाराप्रमाणे जपले. म्हणूनच आज टाटा यांना निरोप देतांना त्यांचे देशभरातील लाखो कामगार आणि चाहते अश्रू ढाळताना दिसले. टाटांना 'भारतरत्न' द्या अशी मोहीम गेली अनेक वर्षे सुरु होती. पण खुद्द रतन टाटा यांनी देशवासीयांची अपार प्रेम हाच माझ्यासाठी 'भारतरत्न' किताब आहे असे सांगून आपल्या मनाचा मोठेपणा सतत दाखवला.माझा देशवासीय आरोग्यसंपन्न आणि सुरक्षित राहिला पाहिजे, हा उद्देश डोळ्यापुढे ठेऊन त्यांनी टाटा ट्रस्टच्या नावाने अनेक समाजोपयोगी ट्रस्ट सुरु केले. त्यातून गोरगरिबांना वैद्यकीय ,शैक्षणिक आणि सामाजिक मदतीचा ओघ सतत सुरु राहिला आहे. आपण 'व्यापारी नसून उद्योजक' आहोत हे सांगणारे रतन टाटा हे देशातील सच्चे समाजसेवक आणि मानवतावादी नेते होते. पैसा आणि संपत्ती जमा करणे हे आपल्या आयुष्याचे उद्दिष्ट नसून देशवासीयांच्या सेवेसाठी उद्योग उभारायचे हा संकल्प टाटा यांनी अखेरच्या श्वासापर्यंत पाळला.रतन टाटा यांना जवळून पाहायचा योग्य अनेकदा मला आलाय.लाखो कोटींचा मालक असलेले टाटा यांचे पाय सतत जमिनीवर असायचे.अगदी एखाद्या कार्यक्रमात सामान्य कामगार अथवा नागरिकांत मिसळून ते त्या कार्यक्रम आणि उपक्रमात सहभागी व्हायचे.बाबुलनाथ येथील रतन टाटा इन्स्टिट्यूटचे कामगार पगारवाढीसाठी टाटांच्या विरोधात घोषणाबाजी करीत रस्त्यावर उतरले होते. रतन टाटा स्वतः तिथे आले आणि रस्त्यावर उतरून त्यांनी आंदोलक कामगारांशी यशस्वी चर्चा करीत त्यांचे समाधान केले हा प्रसंग मी स्वतः काही वर्षांपूर्वी डोळ्याने पाहिलाय.त्यामुळे दयाळू आणि कष्टकऱ्यांची जाण असणारा उद्योगपती हि टाटा यांना दिली जाणारी उपाधी अगदी सार्थक असल्याचे मला ठाऊक आहे. १९३७ मध्ये एका सामान्य पारसी कुटुंबात जन्मलेले रतन टाटा हे जिद्द आणि परिश्रमाच्या बळावर केवळ भारतीयांच्या नव्हे तर जगभरातील नागरिकांच्या गळ्यातले ताईत बनले. टाटा उद्योगसमूहाचे नेतृत्व आल्यावर १९८१ सालापासून रतन टाटा यांचे कर्तृत्व अधिकच उजळले.आपल्या अफलातून नेतृत्व गुणांच्या बळावर त्यांनी टाटा उद्योगसमूहाचा विस्तार जागतिक पातळीवरही वाढवला. भारताला आर्थिक महासत्ता बनवण्याचे स्वप्न साकारण्यात उद्योजक म्हणून रतन टाटा यांचे योगदान बहुमूल्य आहे.त्यांचे प्राणीप्रेमी हा तर देशभरात चर्चिला जाणारा विषय आहे. मुंबईतील भटक्या श्वानांची कुत्तरओढ पाहून त्यांचे मन दुःखी झाले यातूनच त्यांनी मुंबईत भटक्या प्राण्यांसाठी पशुवैद्यकीय रुग्णालय आणि भटक्या श्वानांसाठी आश्रय देणारा निवारा उभारला.स्वतःचा पाळीव श्वान आजारी असताना त्यांना ब्रिटनचे राजपुत्र प्रिन्स चार्ल्स यांनी जाहीर केलेला पुरस्कार त्यांनी नाकारला.माझा लाडका डॉगी आजारी आहे मी तुमचे आमंत्रण स्वीकारू शकता नाही असा निरोप त्यांनी राजपुत्र चार्ल्स यांना पाठवला. हा किस्सा त्यांचे सहकारी उद्योजक सुहेल सेठ यांनी टाटा यांना आदरांजली वाहताना सांगितला.टाटा उद्योगसमूहाच्या कामगारांसाठी तर रतन टाटा हे साक्षात परमेश्वरच ठरल्याची भावना हि त्यांच्या दातृत्वगुणांना आणि साधेपणाला मिळालेली मोठी पोचपावती होय. जगातील अनेक देशांनी रतन टाटा यांना नेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. कारण या देशाच्या प्रगतीत तेथील टाटांच्या उद्योगांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. एका गरीब कुटुंबाला भर पावसात टॅक्सी मिळाली नाही आणि ते भिजत निघाली हे पाहून दयाळू रतन टाटांचे मन दुःखी झाले. त्यातूनच त्यांनी गरीब, सामान्य नागरिकांनाही परवडेल अशी नॅनो कार तयार करायचे ठरवले आणि देशभरात नॅनो कारचे उत्पादनही केले. भारतीय क्रीडा क्षेत्रालाही रतन टाटा यांच्या योगदानाचा मोठा लाभ झाला आहे. देशाला अनेक प्रतिभावंत क्रिकेटपटू ,हॉकीपटू ,फुटबालपटू आणि कबड्डीपटू टाटा उद्योगसमूहाने दिले आहेत. दिलीप वेंगसरकर ,रवी शास्त्री ,युवराज सिंह , हरभजन सिंग ,मिलिंद रेगे,जवागल श्रीनाथ,इरफान पठाण, अजित आगरकर ,संदीप पाटील, किरण मोरे ,फारूख इंजिनिअर,सौरभ गांगुली ,शार्दूल ठाकूर हे क्रिकेट जगत गाजवणारे स्टार क्रिकेटर टाटा समूहातून खेळून मोठे झाले आहेत.सामान्य घरापासून थेट क्रीडा क्षेत्राशी आपले अतूट नाते ठेवणारा उद्योगपती म्हणून रतन टाटा हे नाव आज केवळ भारतवर्षातच नव्हे तर जगभरात गाजतेय.एक दयाळू ,कनवाळू उद्योजक,दूरदर्शी नेता आणि प्रखर राष्ट्रप्रेमी उद्योगपती आज आपल्यात नाहीय हि जाणीवच देशवासियांना अस्वस्थ करून सोडणारी आहे. भारतमातेच्या या थोर सुपुत्राला 'शत शत' नमन.

**- नवनाथ दांडेकर**



# उद्योग'रत्न' टाटांना अखेरचा निरोप

## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**प्रतिनिधी**
**मुंबई**

देशातील प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांच्या पार्थिवावर वरळी येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. विविध क्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीत रतन टाटा यांना अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी नागरिकांची प्रचंड गर्दी जमली होती.

उद्योगपती रतन टाटा यांचे बुधवारी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. काही दिवसांपासून त्यांच्यावर मुंबईतील ब्रीचकॅण्डी रुग्णालयात उपचार सुरु होते. दरम्यान, त्यांची प्रकृती बिघडल्याने वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी रुग्णालयातच अखेरचा श्वास घेतला. रतन टाटा यांच्या निधनाने संपुर्ण देशभरात शोककळा पसरली. तसेच त्यांच्या जाण्याने राज्य शासनाने एक दिवसाचा दुखवटाही जाहीर केला होता. रतन टाटा यांच्या निधनानंतर गुरुवारी दुपारी ४ वाजेपर्यंत एनसीपीए इथे त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केंद्र सरकारच्या वतीने रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण केली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांच्यासह विविध क्षेत्रातील लोकांनी एनसीपीए येथे त्यांचे अंत्यदर्शन घेत श्रद्धांजली वाहिली. दरम्यान, अंतिम संस्काराच्या वेळी अनेक मोठमोठ्या लोकांसह सर्वसामान्य नागरिकांनीही एकच गर्दी केली होती.

# आता मी मुख्यमंत्री होणारच!

## पटोलेंच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

**प्रतिनिधी**
**मुंबई/भंडारा**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत मुख्यमंत्रीपदावरून राजकारण रंगताना दिसत आहे. ठाकरे सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे हे वारंवार मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करण्याची मागणी करत आहेत. तर दुसरीकडे काँग्रेसकडून नाना पटोले यांना मुख्यमंत्री करण्याच्या हालचाली सुरू आहेत. अशातच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आता मी मुख्यमंत्री होणारच, असे वक्तव्य केले आहे. त्यांनी हे वक्तव्य अजित पवार गटाचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना केले आहे.

भंडाऱ्यात नुकताच विंडविल कंपनीचा भूमिपूजन सोहळा पार पडला. यावेळी खासदार प्रफुल्ल पटेल यांनी नाना पटोले यांच्याबद्दल बोलताना म्हटले होते की, ते भावी आणि भावीच राहणार आहेत. यासंदर्भात नाना पटोले यांना प्रश्न विचारला असताना त्यांनी प्रतिक्रिया दिला आहे. ते म्हणाले की, भंडारा गोंदिया जिल्ह्याच्या लोकांना त्यांच्याकडून (प्रफुल्ल पटेल) फार काही अपेक्षा नाहीत. त्यांनी माझ्या विरोधात जे काही षडयंत्र तयार केलेलं होतं, त्या षडयंत्राला मागे टाकत मी कायम पुढे गेलो आहे. मला आमदार होऊ देत नव्हते, पण मी आमदार झालो. खासदार होऊ देत नव्हते, पण मी खासदार झालो, विधानसभा अध्यक्ष सुध्दा झालो आणि आता मी मुख्यमंत्री होणार म्हणजे होणारच. हायकमांड जो निर्णय घेईल, तो मला मान्य असेल, असे सूचक वक्तव्यही पटोले यांनी केले. परंतु पटोले यांच्या या वक्तव्याने महाविकास आघाडीच्या

# मुंबईकरांचा गरबा पाण्यात, ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस

**प्रतिनिधी**
**मुंबई**




गेले काही दिवस उसंत घेतलेल्या पावसाने मुंबईत पुन्हा एकदा जोरदार बरसण्यास सुरुवात केली आहे. पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे मुंबईत उकाडा वाढला होता. मात्र, गुरुवारी संध्याकाळी जोरदार पावसाने मुंबईकरांची दाणादाण उडवली. विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटाने मुंबईकरांच्या मनात धडकीच भरली. या जोरदार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. अचानक आलेल्या पावसामुळे नोकरदारांची तारांबळ उडाली.

दरम्यान, मुंबईत गुरुवारी हलक्या पावसाचा, तर शुक्रवारी वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला होता. मुंबईसह उपनगरात, तसेच ठाणे, कल्याण – डोंबिवली, बदलापुरात पावसाच्या जोरदार सरी गुरुवारी संध्याकाळी कोसळू लागल्या. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. तसेच या जोरदार पावसामुळे सखल भागात पाणी साचले. मात्र, अवेळी आलेल्या पावसामुळे मुंबईत गरबा खेळणाऱ्यांची मोठीच तारांबळ उडाली.

# दिल्लीत 200 किलो कोकेन जप्त तब्बल 2 हजार कोटींचा माल

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने दिल्लीतून 2 हजार कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले आहे. सुमारे 200 किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने रमेश नगर भागातील एका गोदामातून ते जप्त केले. यासह आतापर्यंत 7 हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत.

दुबईत उपस्थित भारतीय नागरिक वीरेंद्र बसोया याचे नाव आंतरराष्ट्रीय सिंडिकेटचा मास्टरमाईंड म्हणून समोर आले आहे. बसोयाला यापूर्वीच भारतात ड्रग्ज प्रकरणात अटक करण्यात आली होती. मात्र जामीन मिळाल्यानंतर तो दुबईला गेला आणि आंतरराष्ट्रीय ड्रग्ज कार्टेलचा मोठा माफिया बनला. 5 हजार कोटी रुपयांच्या ड्रग्ज सिंडिकेटचा मास्टरमाईंड आणि मुख्य आरोपी तुषार गोयल आणि वीरेंद्र बसोया हे जुने मित्र असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. बसोयानेच तुषारला ड्रग्जच्या नात्यात स्वत:शी जोडले होते. बसोयाने कोकेनच्या डिलिव्हरीच्या बदल्यात तुषारला प्रत्येक खेपेमागे 3 कोटी रुपये देण्याचा करार केला होता. दुबईतील बसोया यांनी या सिंडिकेटशी संबंधित यूकेमध्ये उपस्थित असलेल्या जितेंद्र गिलला भारतात जाण्यास सांगितले होते. यानंतर जितेंद्र गिल ड्रग्ज डीलसाठी तुषारला भेटण्यासाठी यूकेहून दिल्लीला आला. जिथे तुषारने त्याला पंचशील परिसरातील एका हॉटेलमध्ये राहायला लावले. यानंतर दोघेही ड्रग्ज खरेदी करण्यासाठी गाझियाबाद आणि हापूरला पोहोचले होते.



# निवडणुकीपूर्वी मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण करण्यास सुरुवात केली. यानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यास सुरूवात केली होती. मात्र कुणबी प्रमाणपत्रावर आक्षेप घेत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावरील सुनावणी आज, गुरुवारी 4 आठवड्यांसाठी पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे राज्य सरकारला दिलासा मिळाला असून विधानसभा निवडणुकांपूर्वी मराठा समाजाल कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी केलेल्या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारने कुणबीच्या नोंदी आढळलेल्या मराठा समाजाला प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली आहे. यासंदर्भात राज्य सरकारने 26 जानेवारी 2024 रोजी अधिसूचना जारी केली होती. या अधिसूचनेत मराठ्यांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊ नका आणि दिलेलं कुणबी प्रमाणपत्र स्थगित करा, अशी प्रमुख मागणी करत मंगेश ससाणे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. विधानसभा निवडणूक असल्याने मुंबई उच्च न्यायालयाने मंगेश ससाणे यांच्या याचिकेवर निकाल दिल्यास राज्य सरकारला मोठा फटका बसण्याची शक्यता होती. मात्र आज पार पडलेल्या सुनावणीवेळी मुंबई उच्च न्यायालयाने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेविरोधातील याचिका चार आठवड्यांसाठी तहकूब करण्यात केली आहे.

### धनगर आरक्षणासाठी काढलेले शुद्धीपत्रक रद्द; राज्य सरकारवर नामुष्की

धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या दृष्टीने सरकारने शुद्धीपत्रक काढले होते. मात्र हे शुद्धीपत्रक एका रात्रीत रद्द करण्याची नामुष्की सरकारवर ओढावली. राज्य सरकारकडून धनगर ऐवजी धनगड वाचावे, असे शुद्धीपत्रक काढण्यात आले होते. मात्र धनगड हे आपल्या राज्यात नाहीत, असे म्हणत धनगर समाजाने या शुद्धीपत्रकावर आक्षेप घेतला होता. तसेच धनगड जातीचे सात दाखले हे छत्रपती संभाजीनगरमध्ये काहींनी काढले होते. हे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीने रद्द केले आहे. तसेच चुकीचे शुद्धीपत्रक काढणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही धनगर समाजाच्या नेत्यांनी केली आहे.

# कॅबिनेटमध्ये पुन्हा धडाका, 38 निर्णय

## नॉन क्रिमिलेयरची मर्यादा 8 वरुन 15 लाख, पत्रकारांसाठी महामंडळ

## रतन टाटांच्या सन्मानार्थ उद्योगरत्न पुरस्काराचं नाव बदललं

### मराठा आरक्षणाला मात्र बगल...

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल कोणत्याही क्षणी वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत विक्रमी 38 निर्णय घेण्यात आले. यात सरकारने नॉन क्रिमिलेयरची मर्यादा 8 लाखांवरून 15 लाख केली असून, लेवा पाटील समाज महामंडळ, संत गोरोबा कुंभार महामंडळ व कोळी समाज महामंडळाचा प्रस्तावही हातावेगळा केला आहे. विशेषतः पत्रकार व वृत्तपत्र विक्रेते यांच्यासाठीही सरकारने 2 स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्रात पुढील आठवड्यात विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने







विविध घटकांशी संबंधित 38 निर्णयांवर शिक्कामोर्तब केले.

आजच्या बैठकीत एकूण 38 निर्णय घेण्यात आले. त्यात काही नवी महामंडळे स्थापन करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. त्यात संत गोरोबा कुंभार महामंडळ, कोळी समाज महामंडळ, लेवा पाटील समाज महामंडळ, पत्रकार व वृतपत्र विक्रेते यांच्यासाठी 2 स्वतंत्र महामंडळ आदींचा समावेश आहे.

सरकारने ओबीसी नॉन क्रिमिलेयरची मर्यादा 8 लाखांवरून 15 लाख करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव सरकारने पुढील कारवाईसाठी केंद्राकडे पाठवला आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाविषयीही मंत्रिमंडळाने अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश दिलेत. पण मराठा आरक्षणाचा विषय आजच्या बैठकीत अजेंड्यावर घेण्यात आला नव्हता, असे गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

मंत्री गिरीश महाजन यांनीही यावेळी मंत्रिमंडळाने घेतलेल्या काही विशेष निर्णयांची माहिती दिली. ते म्हणाले, मराठवाड्यात गुजर समाज, लेवा पाटील समाज मोठ्या संख्येने आहे. त्यांच्यातील गरीब घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी सरकारने लेवा पाटील समाज महामंडळ स्थापन केले आहे. सरकारने हा निर्णय कुणाला खुश करण्यासाठी नव्हे तर वस्तुस्थिती पाहून घेतला आहे. सरकारने उद्योगपती रतन टाटा यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याचाही निर्णय घेतला आहे.

**सविस्तर वृत्त पान 3 वर**



*मुंबई : शिवसेना नेते, विभागप्रमुख, आमदार अँड. अनिल परब यांच्या नेतृत्वाखाली, मुंबई च्या विविध प्रलंबित प्रश्नावर चर्चा करण्यासाठी मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या दालनात बुधवारी बैठक आयोजित करण्यात आली होती, एच पूर्व विभागातील अपुरा पाणी पुरवठा, कमी दाबाने होत असलेला पाणी पुरवठा, दूषित पाणी पुरवठा, अनधिकृत बांधकाम अश्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली, त्याप्रसंगी वांद्रे पूर्व विधानसभा संघटक/ माजी नगरसेवक सदा परब, विधानसभा समन्वयक / माजी नगरसेवक चंद्रशेखर व्यंगणकर, उपविभागप्रमुख/ माजी नगरसेवक दिपक (राजू) भूतकर, माजी नगरसेवक हाजी हलीम, माजी नगरसेविका सौ हर्षदा मोरे व इतर उपस्थित होते.*



## थोडक्यात

### वसईत 'ड्रिंक अँड ड्राईव्ह' प्रकरणात दुचाकी पेटवली

**वसई:** वसई पश्चिमेकडील सनसिटी परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. रविशंकर नायर नावाच्या एका तरुणाला वाहतूक पोलिसांनी 'ड्रिंक अँड ड्राईव्ह' प्रकरणी अडवले असता, त्याने संतापाच्या भरात आपली दुचाकी पेटवली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, रविशंकर नायर हा तरुण दारूच्या नशेत दुचाकी चालवत होता. वाहतूक पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली असता, तो संतापला आणि रागाच्या भरात त्याने आपली दुचाकी पेटवली. पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून त्याला ताब्यात घेतले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली असून पोलिसांनी घटनेची नोंद केली आहे.

### बेस्ट उपक्रमातर्फे वीज ग्राहकांसाठी अभय योजना

**मुंबई :** बेस्ट उपक्रमात, वीजदेयकाची थकबाकी न भरल्यामुळे ज्यांचे वीजमापक .०१/१०/२००६ ते ३१/१२/२०२० या कालावधीत काढण्यात आले आहेत, अशा वीज ग्राहकांसाठी अभय योजना २०२४ राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत थकबाकीवरील व्याज व विलंबित आकारांची माफी बेस्ट उपक्रम ग्राहकांना देणार आहे. या योजनेचा फायदा वीज ग्राहक ०१/०८/२०२४ ते ३०/०१/२०२५ या सहा महिन्यांच्या कालावधीत घेऊ शकतात. अधिक माहितीसाठी व योजनेचा लाभ घेण्यासाठी वीज ग्राहकांनी संबंधित प्रभागाच्या विभागीय अभियंता, ग्राहकसेवा यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन बेस्ट उपक्रमाने वीज ग्राहकांना केले आहे.

### 20 ऑक्टोबर रोजी अंधेरीत मराठी वधु -वर मेळावा

**मुंबई :** मराठी वधु वर सूचक केंद्र अंधेरी (पूर्व), मुंबईच्या विद्यमाने मराठी वधु वरांचा मेळावा रविवार, २० ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ४ ते रात्री ९ या दरम्यान मुंबई पब्लिक स्कूल सभागृह, नित्यानंद स्कूल, गरवारे चौक, बहार सिनेमाजवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ६९. येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यासाठी प्रवेश शुल्क रु. ५००/- असून हॉलवर दुपारी ३.३० वाजता नोंदणी सुरू होणार आहे. इच्छुक वर वधू उमेदवारांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या संचालिका श्रीमती आशाताई परब यांनी केले आहे. इच्छुकांनी दामिनी पानवलकर ८०९७२४४१२४ व अंकिता पालकर ८८७९१९३९३२ यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसई विधानसभेसाठी उमेदवारीची चुरस आणि राजकीय खेळी

## काँग्रेसची उमेदवारी कोणाला?

प्रतिनिधी
■ वसई

महाविकास आघाडीच्या जोरदार कामगिरीनंतर वसई विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवाराच्या निवडीसाठी सध्या जोरदार हालचाली सुरू आहेत. नुकत्याच पालघरमध्ये पार पडलेल्या काँग्रेसच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींनंतर, आता सर्वांचे लक्ष कोणत्या उमेदवाराच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडणार याकडे लागले आहे. काँग्रेसच्या या उमेदवारी निवडीकडे संपूर्ण वसईकरांचे लक्ष लागले आहे, आणि यामुळे येत्या निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार कोण असेल याची चर्चा रंगू लागली आहे. महाविकास आघाडीने वसई मतदारसंघ काँग्रेससाठी राखून ठेवण्याचे संकेत मिळाले आहेत, ज्यामुळे काँग्रेसच्या गोटात नवा उत्साह आहे.

बहुजन विकास आघाडीचे ज्येष्ठ नेते राजीव पाटील यांचा भाजप प्रवेश हा सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. त्यांच्या प्रवेशाबद्दल अद्याप अंतिम निर्णय झाला नसला तरी, जर ते भाजपमध्ये गेले तर वसईतील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात.

भाजपकडून त्यांना वसई, नालासोपारा आणि बोईसर या मतदारसंघांमध्ये मोठ्या जबाबदाऱ्या दिल्या जातील असा अंदाज व्यक्त केला जात आहे.जर राजीव पाटील भाजपात प्रवेश करतात, तर बहुजन विकास आघाडीला महाविकास आघाडीच्या मदतीची गरज भासेल. महाविकास आघाडीसोबत असलेली बहुजन विकास आघाडी भाजपला कडवी टक्कर देऊ शकते. त्यामुळे तिन्ही मतदारसंघांमध्ये मोठी चुरस निर्माण होईल.

**वसईतील राजकीय संघर्षाची पुढील दिशा**

*काँग्रेसकडून पार पडलेल्या उमेदवारी मुलाखतीनंतर, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत कोणती लॉटरी कोणाला लागेल, याची उत्सुकता वाढली आहे. लोकसभेत महाविकास आघाडीला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादामुळे काँग्रेसच्या आशा उंचावल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, वसई विधानसभा मतदारसंघात भाजप आणि महाविकास आघाडीमध्ये जोरदार लढत होणार हे निश्चित दिसते.वसईच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजीव पाटील यांच्या निर्णयानंतर पुढील राजकीय चाल कोण खेळणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.*

# वसई पूर्व प्रवेशद्वारे सुशोभीकरणापासून उपेक्षित

## माजी नगरसेविका प्रिती म्हात्रेंचे महापालिकेला आवाहन

प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्वेकडील भागाचे प्रमुख प्रवेशद्वार उपेक्षित असल्यामुळे तिथल्या सुशोभीकरणाची मागणी जोर धरत आहे. या विषयावर माजी नगरसेविका प्रिती म्हात्रे यांनी महापालिकेकडे अर्ज करून परिसरातील विकासासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी विशेषतः कामण, कोल्ही, चिंचोटी, देवदल, सातिवली आणि इतर आसपासच्या परिसरातील प्रवेशद्वारांच्या सुशोभीकरणाचे महत्त्व मांडले आहे.

वसई पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वारांची दुरवस्था आणि सौंदर्यीकरणाच्या अभावामुळे या भागाचा विकास थांबला आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या नागरिकांना तसेच पर्यटकांना या ठिकाणांचा आनंद घेण्यासाठी सोयीसुविधांचा अभाव भासतो आहे. 9 मार्च 2023 रोजी महापालिकेकडे सादर केलेल्या पत्राच्या आधारे, त्यांनी या भागात तातडीने सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

पर्यावरणीय दृष्टीकोनातून या प्रवेशद्वारांवर हिरवळ, रोपे आणि फुलांचे झाडे लावणे गरजेचे असून, यामुळे परिसराचे सौंदर्य वाढवता येईल आणि या ठिकाणी येणाऱ्यांना एक स्वागतार्ह वातावरण मिळेल. याचबरोबर महापालिकेने संबंधित भागात पथदिव्यांची योग्य सोय करून सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याची देखील मागणी केली आहे.

**महापालिकेकडून ठोस पावले अपेक्षित**

*वसई पूर्वेकडील प्रमुख प्रवेशद्वारांचे सौंदर्यीकरण आणि विकासासाठी महापालिकेकडून ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. महापालिकेने शहरातील विविध भागांमध्ये सर्वेक्षण मोहीम हाती घेण्याचे ठरवले आहे, ज्यामुळे या क्षेत्रातील अडचणी सोडवून कामे वेगाने पूर्ण केली जातील. प्रिती म्हात्रे यांनी या अर्जात विशेषतः स्थानिक नागरिकांच्या समस्या मांडल्या असून, त्यांना होणारा त्रास आणि महापालिकेच्या कार्यप्रणालीत तातडीने सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली आहे. शहराच्या पूर्व भागातील प्रवेशद्वारांचे सौंदर्यीकरण पूर्ण झाल्यास या भागातील आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना मिळेल, असे मत व्यक्त केले जात आहे.*

# मालाड पूर्व येथील प्रभाग क्रमांक 43 मध्ये पाणी टंचाई

## स्थानिक नागरिकांनी सहाय्यक आयुक्तांना विचारला जाब



प्रतिनिधी
■ मुंबई

दिंडोशी विधानसभेतील प्रभाग ४३ मध्ये अनेक ठिकाणी दूषित व कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे तसेच काही भागात अजिबात पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे प्रभागातील लोकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. पाण्याची टंचाई दूर करून लोकांना सुरळीत पाणी पुरवठा व्हावा आणि पुरेसे पाणी मिळावे म्हणून काल भाजपा माजी नगरसेवक, नेते विनोद मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक नागरिकांनी सहाय्यक आयुक्त, पी/उत्तर विभाग यांच्या कार्यालयास भेट देऊन संबंधित महापालिका अधिकाऱ्यांना जाब विचारला.

यावेळी झालेल्या संयुक्त बैठकीत पाणी प्रश्न सोडविण्याविषयी त्यांनी मागणी केली. त्यावेळी पी/उत्तर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला व विभागातील पाणी समस्या येत्या १५ दिवसांत सोडविण्याचे तसेच पाणी समस्येबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येईल असे आश्वासन दिले. मात्र जर का येत्या १५ दिवसांत पाणी समस्या सोडविली नाही तर स्थानिक नागरिकांसह पुन्हा उग्र स्वरूपाचे ठिय्या आंदोलन करण्यात येईल. असा इशारा मिश्रा यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिला.

# चेंबूर नागरिक सहकारी बँकेची 50वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

दि चेंबूर नागरिक सहकारी बँक लि.ची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या अध्यक्षा प्रविणा ठक्कर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एल.यु. गडकरी सभागृह, स्वामी मुक्तानंद हायस्कूल, सुभाष नगर, चेंबूर, येथे पार पडली.

सभेस बँकेचे उपाध्यक्ष अनिल ठाकूर, संचालक छाया मंडलेचा, कृष्णकांत कोळी, प्रसाद वालावलकर, बबनराव घोडके, अँड. जनार्दन बोरकर, सीए धीरज जैन, सीए रुपेश पाटील, विनायक म्हात्रे, अँड. वैशाली पालवे, मिनाक्षी पाटणकर, अमित सातार्डेकर, कर्मचारी प्रतिनिधी सुशांत सावंत व गणेश सातार्डेकर



यांची समायोजित भाषणे झाली.

बँकेच्या कामकाजाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक सभेपुढे मांडताना संचालक सीए रुपेश पाटील यांनी बँकेस अहवाल वर्षी रु.१.९४ कोटी नफा झाल्याचे नमूद केले. या वार्षिक सभेचे सूत्रसंचालनसरव्यवस्थापक विकास पाटील यांनी केले. सभासदांची सभेस लक्षणीय उपस्थिती होती. सभेचा समारोप करताना उपाध्यक्ष अनिल ठाकूर यांनी उपस्थित सभासदांचे आभार मानले. या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या सर्व अधिकारी,कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# बेस्ट मधील कंत्राटी कामगारांचा विविध मागण्यांसाठी वडाळा आगारावर मोर्चा

■ मुंबई

बेस्ट कामगारांच्या मागण्यांकडे बेस्ट प्रशासन, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र राज्य सरकार यांचे लक्ष्य वेधण्यासाठी काल वडाळा आगार येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाचे नेतृत्व बेस्ट वर्कर्स युनियनचे सरचिटणीस



शशांक राव यांनी केले.

भाडेतत्त्वावर पुरविलेल्या बसगाड्यांवर कार्यरत असलेल्या बसचालक, वाहक व इतर कामगारांना बेस्ट उपक्रमामध्ये कायम कामगार म्हणून समाविष्ट करण्यात यावे., "समान कामाला, समान दाम" या तत्त्वानुसार कंत्राटी कामगारांनाही बेस्ट उपक्रमामधील समकक्ष, कायम व नियमीत कामगारांना लागू असलेले वेतनमान व इतर सेवा सवलती तातडीने लागू करण्यात याव्यात., कंत्राटी कामगारांनाही बेस्ट उपक्रमातील क़ायम कामगारांइतकेच बोनस/सानुग्रह अनुदान प्रदान करण्यात यावे. अनुचित कामगार प्रथा बंद करण्यात याव्यात. या मागण्या पूर्णपणे मान्य होईपर्यंत आपल्या हक्काचा लढा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी कामगारांनी केला. असे शशांक राव यांनी सांगितले.

# भागीदारांकडून एसआरएची दिशाभूल होण्याची शक्यता

## बिल्डरचे एसआरए आणि पोलिस उपायुक्तांना निवेदन

प्रतिनिधी
■ मुंबई

आपल्या भागीदारांकडून कंपनीच्या कागदपत्रांचा गैरवापर करून ती एसआरएला सादर करून चुकीचे दावे करत दिशाभूल केली जाण्याची शक्यता असल्याने कुर्ला येथील बिल्डर अब्दुल राशीद राजापूरकर यांनी पोलिस उपायुक्त आणि एसआरएला त्याबाबत तक्रारअर्ज सादर केला आहे. एसआरएने त्याबाबत दानी बिल्डर्सकडून सात दिवसांत खुलासा करण्याची नोटीस दिली आहे.

दानी बिल्डर्स आणि डेव्हलपरचे अब्दुल राजापूरकर यांनी आपली बांधकाम कंपनी नोंदणीकृत असून तिची कागदपत्रे आणि कुलमुखत्यारपत्र आपल्याकडे असल्याचे सांगून अब्दुल रहीम रमझान शाह, वीरचंद मूरजी विशारिया, धरमशी देवजी पटेल, रियाझ रमजान शाह आणि त्यांचा मुलगा जुनेद रियाज शाह यांच्याकडे कोणतीही कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट करीत ही तक्रार केली आहे. पुढील काळात विकास प्रकल्प आणि पुनर्वसन प्रक्रियेसंदर्भात अब्दुल रहीम रमझान शाह, वीरचंद मूरजी विशारिया, धरमशी देवजी पटेल, रियाझ रमजान शाह आणि त्यांचा मुलगा जुनेद रियाज शाह यांनी एसआरएकडे कोणतीही कागदपत्रे सादर केल्यास त्यांची पुर्ण पडताळणी करण्यात यावी आणि त्याबाबत आपणास अवगत करण्यात यावे, असे या अर्जात राजापूरकर यांनी म्हटले आहे.

# उमेद कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यासाठी आझाद मैदानात आंदोलन सुरु

प्रतिनिधी
■ मुंबई

८४ लाख ग्रामीण कुटुंबांच्या उज्वल भवितव्यासाठी शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राजbविभागांतर्गत 'उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत २८०४ कंत्राटी अधिकारी, कर्मचारी यांना शासनाच्या समकक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेणे. उमेद संघटनेच्या वतीने दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजीपासून आझाद मैदान येथे प्रभाकर गावडे संघटनेचे मार्गदर्शक तथा कृती समिती सदस्य आमरण उपोषणाला बसले असून सर्व महिला व स्टाफ धरणे आंदोलनात सहभागी झालेले असून शासनाकडून मागणी पूर्ण झाल्याचा शासन निर्णय घेतल्याशिवाय दसऱ्याला घरी जाणार नाही या निर्धाराने लाखो





महिला मुंबईत येत आहेत. भारतीय जनता पार्टीचे कामगार नेते शिवाजी पाटील यांनी आझाद मैदान येथे उमेदच्या सर्व कर्मचारी बांधवांच्या समस्या ऐकून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.

आपण आमच्या राज्याचे कुटुंबप्रमुख, आधार, पालक, लोकप्रतिनिधी म्हणून आपणास नम्रपणे विनंती करण्यात येते की वरील एकमेव न्याय मागणीच्या पूर्ततेसाठी सोबत दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे पूर्ण होणेसाठी आपण आम्हा ८४ लाख कुटुंबाना न्याय मिळवून देणेसाठी मा. मत्रीमंडळात निर्णय घेऊन संबंधिताना मागणी पूर्ततेचा शासन निर्णय दिनांक दि. ११ ऑक्टोबर २०२४ रोजीपर्यंत काढून अंमलबजावणी आदेश निर्गमित करावा यासाठी आदेशित करणेसाठी आमचे प्रतिनिधी आधार म्हणून आझाद मैदान येथे उपस्थित राहून आम्हाला पाठींबा द्यावा व आम्हाला न्याय मिळवून देणेसाठी मागणीबाबत प्रचार प्रसार करून मार्गदर्शन करावे. जेणेकरून आम्ही दसऱ्याच्या सणाला घरी जाता येईल. ही नम्र विनंती. असे साकडे संघटनेने घातले आहे.

# आज रामिम संघ व एमआरआरकेचा दसरा संमेलन-वर्धापनदिन सोहळा

**मुंबई :** राष्ट्रीय मिल मजदूर संघ आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघाचा उद्या शुक्रवार दि.११ रोजी सकाळी १० वाजता,दसरा संमेलन आणि वर्धापन दिन सोहळा,मनोहर फाळके सभागृहात संपन्न होणार आहे. अध्यक्षस्थान संघटनेचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर भुषविणार आहेत. सरचिटणीस गोविंदराव मोहिते उपस्थितांचे स्वागत करतील.त्यावेळी सर्व पदाधिकारी, प्रतिनिधी,कार्यकर्ते उपस्थित राहून सोनेलुटन्याचा पारंपारिक कार्यक्रम पार पडेल आणि अध्यक्ष आमदार सचिन अहिर कामगारांना मार्गदर्शन करतील.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, गाव मौजे वाघोली ता: वसई येथील सर्वे नं. जुना ४४, नवीन ४१, हिस्सा नं. ३ क्षेत्र ०.०८.३ आकार १.७५ रू. पै, सर्वे नं. जुना ४४ नवीन ४१ , हिस्सा नं. १ क्षेत्र ०.०९.४ आकार २.०० रू. पै सर्वे नं. जुना १०५, नवीन ६५ हिस्सा नं ४ क्षेत्र ०.०९.५ पैकी ०.०४.७५ आकार २.१२ रू. पै, सर्वे नं. जुना १०६, नवीन ६६, हिस्सा नं. ३ क्षेत्र ०.०८.५ आकार १.८८ रू. पै, सर्वे नं. नवीन ७०, जुना १०३, हिस्सा नं. १ क्षेत्र ०.०८.३ आकार १.९४ रू. पै, सर्वे नं. जुना ९९, नवीन ७३, हिस्सा नं. ४ क्षेत्र ०.१२.१ आकार २.७५ रू.पै, सर्वे नं. जुना १०२, नवीन ७५, हिस्सा नं. ५ क्षेत्र ०.१३.७ आकार ३.०६ रू.पै., एकूण क्षेत्र ०.६५.०५ ह्या जमीन मिळकती माझे अशील श्री जयवंत भाऊ नाई क व श्री. किशोर भाऊ नाईक यांच्या मालकी कब्जेवहीवाटीच्या असुन सदर मिळकतीच्या मालकीचा दस्त म्हणजेच खरेदीखत दस्त नोंदणी क्र. वसई-३, १००३२/२०११, दि. २६/०७/२०११ च्या दस्ताच्या पूर्न खरेदीखताचा दस्त नोंदणी क्र ५१३५/२०१५ हा मुळ दस्त गहाळ झाला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसबंध, गहाण, दान, बक्षिस, तारण, कुळवहिवाट, वारसा, भाडेपटटा, वहिवाट, किवा अन्य स्वरूपाचा दावा असल्यास त्यांनी त्याची लेखी स्वरूपातील महिती योग्य कागदोपत्री पुराव्यानिशी निम्नस्वाक्षरीकर्ता ॲड जितेश एकनाथ म्हात्रे यांच्याकडे बी/३०१, सुगंधी हाइटस, बोळींज खारोडी नाका, दिशा हॉटेल जवळ, विरार पश्चिम, ता वसई, जि. पालघर, येथे या सुचनेच्या प्रसिध्दीपासुनच्या १४ दिवसाच्या आंत पाठवावी वर दिलेल्या मुदतीत जर हरकत पोहचली नाही तर सदर मिळकतीचा व्यवहार हरकत विरहित आहे व हरकत असल्यास सोडुन दिली आहे असे गृहित धरले जाईल.

**ॲड. जितेश एकनाथ म्हात्रे.**

# महामार्गावरील वाहतूककोंडीमुळे चाकरमान्यांना त्रास; एस.टी. बस सेवाही विस्कळीत

## महामार्ग आणि अंतर्गत रस्त्यांच्या कामामुळे प्रवाशांना रोजचा मनस्ताप

प्रतिनिधी
■ वसई

महामार्गावरील सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम आणि अंतर्गत रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहतूककोंडीची समस्या चाकरमान्यांसाठी गंभीर बनली आहे. कामावर जाणारे आणि घरी परतणारे कामगार प्रचंड त्रास सहन करत आहेत, कारण वाहनांच्या सततच्या विलंबामुळे त्यांचा वेळ आणि श्रम वाया जात आहेत. खासकरून एस.टी. बस सेवाही यामुळे विस्कळीत झाली असून, बस वेळेत न येण्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

महामार्गाचे काँक्रिटीकरण पावसाच्या विश्रांतीनंतर सुरू झाले आहे. परंतु, या कामात योग्य नियोजनाचा अभाव असल्याने महामार्गावर अवजड वाहनांच्या लांबलचक रांगा लागत आहेत. यामुळे प्रवाशांना अनावश्यक विलंब सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर, पावसाळ्यात खराब झालेले अंतर्गत रस्ते दुरुस्तीअभावी धुळखात पडले आहेत. हे रस्ते वाहतुकीचा अडथळा बनले आहेत आणि त्याचा परिणामही चाकरमान्यांच्या प्रवासावर होत आहे.

वाहतूककोंडीमुळे एस.टी. बस वेळेवर पोहोचत नाहीत, ज्यामुळे चाकरमान्यांना कामावर पोहोचण्यास तासभर उशीर होतो. संध्याकाळी घरी परतताना देखील त्यांना याच समस्येला सामोरे जावे लागत आहे. रात्री महामार्गावरील काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याने उशीराने घरी पोहोचणाऱ्या प्रवाशांना प्रचंड त्रास होतो. परिणामी, त्यांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत आहे.

महामार्गावरील आणि अंतर्गत रस्त्यांवरील कामे योग्य व्यवस्थापनाशिवाय चालू असल्यामुळे, प्रवाशांना अद्यापही वाहतूककोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागणार आहे. जबाबदार प्रशासनाने या समस्येचे त्वरित निराकरण करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

घनकचरा व्यवस्थापन विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका प्रभाग क्र.१९ मधील हाजुरी येथील एल्डर्स पॅरेडाईस व TDRF इमारत या वास्तुच्या दैनंदिन साफसफाई करणेसाठी वार्षिक निविदा मागविणसे मान्यताप्राप्त व अनुभवी निविदाकाराकडून www. mahatender.gov.in या संकेतस्थळावर ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव** | ठाणे महानगरपालिका प्रभाग क्र.१९ मधील हाजुरी येथील एल्डर्स पॅरेडाईस व TDRF इमारत या वास्तुच्या दैनंदिन साफसफाई १ वर्ष कालावधीकरीता करणे. |
| निविदा प्रपत्र विक्री | दि.११/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० |
| निविदा सादर करावयाची अंतिम तारीख | दि.२४/१०/२०२४ वेळ दुपारी : ३.०० वाजता |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि.२४/१०/२०२४ वेळ दुपारी : ४.०० वाजता |

प्राप्त झालेली कोणतीही निविदा पूर्णत: अथवा अंशत: स्विकारणे अथवा नाकारण्याचे हक्क ठाणे महानगरपालिकेकडे राहतील.

ठामपा/पिआरओ/घ.क.व्य/७४०/२०२४-२५ **सही/-**
दि:१०.१०.२०२४ उपआयुक्त
Pls visit our official web-site घनकचरा व्यवस्थापन विभाग
www.thanecity.gov.in ठाणे महानगरपालिका, ठाणे

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

माहिती व जनसंपर्क विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत द्विवार्षिक कालावधीसाठी विविध विविध कार्यक्रम, समारंभ, अतिक्रमण कारवाई, धोकादायक इमारतीवरील कारवाई, विविध बैठका इत्यादी बाबतची रंगीत छायाचित्र घेणेबाबतचे काम करणेकरीता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदरची निविदा दि.११.१०.२०२४ ते दि.२५.१०.२०२४ या कालावधीत दु.१६.०० वाजेपर्यंत https:// mahatenders. gov.in या ठाणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध होतील. निविदाकारांनी त्यांच्या निविदा दि.२५.१०.२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यत ई-टेंडरींग पध्दतीने सादर कराव्यात. प्राप्त निविदा दि.३०.१०.२०२४ रोजी निविदाकार अथवा त्याचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. अधिक माहितीसाठी ठाणे महानगरपालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागाशी ०२२-२५३६४७७९ वर संपर्क साधावा. कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ठाणे महानगरपालिकेचा राहील.

ठामपा/पिआरओ/७४९/२०२४-२५ **सही/-**
दि:१०.१०.२०२४ उपआयुक्त (जनसंपर्क )
**plsvisitourofficialweb-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 111**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १११**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## समीरा रेड्डी यांच्याहस्ते होली फॅमिली हॉस्पिटलच्या वन-स्टॉप ब्रेस्ट क्लिनिकचे उद्घाटन

**मुंबई :** ब्रेस्ट कॅन्सर जागरूकता महिन्याच्या निमित्ताने, होली फॅमिली हॉस्पिटल, वांद्रे (प.) ने आज आपले 'वन-स्टॉप ब्रेस्ट क्लिनिक' सुरू केले. लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री समीरा रेड्डी यांच्या हस्ते या क्लिनिकचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. मुंबईसह जगभरातील महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग हा सर्वात सामान्य कर्करोग असल्याने, होली फॅमिली हॉस्पिटलची नवीन सुविधा महिलांना वेळेवर आणि सर्वसमावेशक स्तनाची काळजी प्रदान करण्यासाठी समर्पित आहे. 'वन-स्टॉप ब्रेस्ट क्लिनिक' स्तनांशी संबंधित आरोग्यविषयक समस्यांशी संबंधित असलेल्यांसाठी लवकर निदान करण्यापासून ते वैयक्तिक उपचार योजनांपर्यंत अनेक सेवा देते.



# नॉन क्रिमीलेअरची मर्यादा 15 लाख करण्याची शिफारस

## राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णयांचा धडाका

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने निर्णयांचा धडाका लावला असून आज, गुरुवारी (10 ऑक्टोबर) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तब्बल 38 निर्णय घेण्यात आले. घराच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या वांद्रे शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी घर, नॉन क्रिमीलेअरची मर्यादा आठ लाख रुपयांवरून 15 लाख रुपये करण्याची केंद्राला शिफारस, पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते यांच्यासह विविध समाजघटकांसाठी महामंडळे, मानधनवाढ, पदभरती, भूखंड वाटप, नामकरण आदी निर्णय घेऊन सरकारने विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना कोणतीही कसर न सोडण्याचा निर्धार केला आहे.



वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहतीमधील सरकारी कर्मचारी आपल्याला कायम स्वरूपी घरे मिळावीत, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करीत आहेत. शासकीय वसाहतीमध्येच अल्प दरात कायमस्वरुपी घरे मिळावीत यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनी वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनाची दखल घेत मंत्रिमंडळाने विधानसभा निवडणुकीत सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नाराजी नको म्हणून वांद्रे शासकीय वसाहतीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून ही समिती जागा आणि सदस्य संख्या निश्चित करण्याबरोबरच इतर कार्यपद्धती ठरविण्यासंदर्भात निर्णय घेणार आहे.

### मंत्रिमंडळाचे निवडक निर्णय

1. वांद्रे शासकीय कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा देणार (सार्वजनिक बांधकाम)
2. सावनेर, कणकवली, राजापूर, अंबरनाथ, जिहे कठापूर, लातूरच्या जलसंपदा प्रकल्पांना मान्यता (जलसंपदा विभाग)
3. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमात सुधारणा (उच्च व तंत्र शिक्षण)
4. कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन समाजकार्य महाविद्यालय (उच्च व तंत्र शिक्षण)
5. राज्यात तीन नव्या खासगी विद्यापीठांना मान्यता. (उच्च व तंत्र शिक्षण)
6. राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये पाळणाघरे सुरू करणार (महिला व बाल)
7. जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उपसभापतींच्या निवडणूकीस मुदतवाढ (ग्राम विकास)
8. सिडको महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिलेले भूखंड कब्जेहक्काने रुपांतरीत करणार (नगर विकास)
9. केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना राबवणार
10. मा. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्रास अतिरीक्त निधी (कृषि).
11. पालघर जिल्ह्यातील विविध गावांतील जागा एमआयडीसीला (महसूल)
12. बोरीवली तालुक्यातील जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी (महसूल)
13. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याच्या अधिनियमात सुधारणा (महसूल)
14. कुर्ल्यातील शासकीय जमीन डायलेसिस सेंटरसाठी शाहीर अमर शेख प्रबोधनीला (महसूल)
15. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयात आफ्रिकन सफारी प्रकल्प (वने)
16. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना (पशुसंवर्धन, दुग्धविकास व्यवसाय)
17. भेंडाळे वस्ती प्रकल्प पाणी पुरवठा विभागास हस्तांतरित (मृद व जलसंधारण)
18. रमाबाई आंबेडकर मधील झोपडपट्टी पुनर्वसनासाठी खासगी जमिनीचा मोबदला देणार (गृहनिर्माण)
19. मराठवाड्यातील शाळांकरीता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत निधी (शालेय शिक्षण)
20. राज्यात आंतरराष्ट्रीय रोजगार व कौशल्य विकास कंपनी (शालेय शिक्षण)
21. शाळांना २० टक्के वाढीव अनुदानाचा टप्पा (शालेय शिक्षण)
22. न्यायमुर्तींच्या खासगी सचिवांना सचिवालयीन संवर्ग (विधि व न्याय)
23. नाशिकरोड, तूळजापूर, वणी-यवतमाळ येथे न्यायालय (विधि व न्याय)
24. नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवणार (कृषि)
25. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य)
26. शबरी महामंडळाच्या थकहमीची मर्यादा वाढवून शंभर कोटी. (आदिवासी विकास)
27. देवळालीतील भूखंड नाशिक रोडच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेला (नगर विकास)
28. मौलाना आझाद महामंडळाच्या भागभांडवलात वाढ (अल्पसंख्याक विकास)
29. मदरशांमधील शिक्षकांच्या मानधनात वाढ (अल्पसंख्याक विकास)
30. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या परेड ग्राऊंडसाठी पशुसंवर्धन विभागाची जागा (गृह)
31. समृध्दी महामार्गास जोडणाऱ्या जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गास मान्यता (सार्वजनिक बांधकाम)
32. कात्रज कोंढवा उड्डाणपुलास बाळासाहेब देवरस यांचे नाव (सार्वजनिक बांधकाम)
33. आपत्ती सौम्यीकरणाची कामे आता स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत (मदत व पुनर्वसन)
34. राहता तालुक्यातील शेती महामंडळाची जागा क्रीडांगणासाठी (महसूल)
35. शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी-वाणी, लोहार, नाथपंथीय समाजासाठी महामंडळे (इतर मागास बहुजन कल्याण)
36. पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र महामंडळे (कामगार)
37. कराड तालुक्यातील उंडाळे योजनेच्या दुरुस्तीस मान्यता (मृद व जलसंधारण)
38. सार्वजनिक रुग्णालयांमध्ये सुलभ शौचालयांची सुविधा (सार्वजनिक आरोग्य)

## ...तर सहाय्यक परिचारिका प्रसाविकांचे बेमुदत आंदोलन अटळ; शशांक राव यांचा इशारा

■ मुंबई

येत्या २५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत रुपये ४२०० ग्रेड पे नुसार कालबद्ध पदोन्नती देण्याबाबत, उचित निर्णय न झाल्यास, २५ ऑक्टोबर २०२४ पासून पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागातील सर्व सहाय्यक परिचारिका प्रसविका बेमुदत आंदोलन करतील. त्याची संपूर्ण जबाबदारी पालिका प्रशासनाची असेल, असे दि म्युनिसिपल युनियनचे अध्यक्ष शशांक राव यांनी जाहीर केले आहे.



मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागात कार्यरत असलेल्या सहाय्यक परिचारिका प्रसविकांना ग्रेड पे रुपये ४२०० नुसार पूर्वलक्षी प्रभावाने कालबद्ध पदोन्नती लागू करण्याबाबत प्रशासनाने अक्षम्य दिरंगाई केलेली असल्याने, प्रत्येक परिचारिकेचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे संबंधित परीचारीकांमध्ये प्रचंड असंतोष व तीव्र चीड निर्माण झालेली आहे.सदर मागणीची पूर्तता व्हावी, याकरिता, बुधवारी कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या एफ/दक्षिण येथील कार्यालयावर दि म्युनिसिपल युनियनच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. सदर मोर्चाच्या शिस्टमंडळा बरोबर झालेल्या चर्चेच्या वेळी, रुपये ४२०० ग्रेड पे नुसार त्वरित योग्य कालबद्ध पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने मा. उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांच्या समवेत बैठकीचे आयोजन करण्यात येईल असे मा. कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा यांनी सांगितले. त्यानंतर परिचारिकांच्या झालेल्या सभेत शशांक राव बोलत होते.

## अनुसूचित जाती-जमाती राज्य आयोग सामाजिक न्यायासाठी कार्यरत - ॲड. मेश्राम

प्रतिनिधी
■ मुंबई

अनुसूचित जाती - जमातीच्या वर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तक्रारी जलदगतीने सोडविण्यासाठी आयोग कार्यरत आहे. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने आयोग न्यायप्रक्रिया राबवित असल्याचे अनुसूचित जाती जमाती राज्य आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शन आणि सहकार्याने राज्य आयोग समानता आणि सामाजिक न्यायासाठी कार्यरत आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या अनेक प्रश्नांना न्याय देण्याच्या आणि समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने अनेक योजना शासनाने अंमलात आणल्या आहेत. आयोगातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी प्रामाणिकपणे कार्यरत असून प्रलंबित प्रकरणाचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी त्यांचे सहकार्य महत्वाचे आल्याचेही त्यांनी सांगितले.

अनुसूचित जाती जमाती राज्य आयोगाकडे प्राप्त १५ तक्रारीवर काल वरळी येथील आरे दुग्ध शाळा इमारतीतील राज्य आयोगाच्या कार्यालयात सुनावणीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपाध्यक्ष मेश्राम बोलत होते. यावेळी पोलीस निरिक्षक सोनम पाटील, रमेश वळवी, संसदीय अधिकारी रत्नप्रभा वराडकर उपस्थित होते.

उपाध्यक्ष मेश्राम म्हणाले की, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आज प्राप्त तक्रारीबाबत सुनावणी घेण्यात आली आहे. राज्य शासनाने आयोगासाठी केलेल्या निधीच्या तरतुदीचा समाजाला न्याय देण्यासाठी योग्य वापर केला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अनुसूचित जाती जमाती संदर्भातील तक्रारी तसेच या प्रवर्गातील शासकीय सेवेतील कर्मचारी आणि अधिकारी यांनी https://sjsa.maharashtra.gov.in/en/maharashtra-state-commission-sc-st या संकेत स्थळावर आपल्या तक्रारींची नोंद करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

अनुसूचित जाती/जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तक्रारी स्विकारणे व तपास करणे. अनुसूचित जाती/जमातीचे कल्याण, आरक्षण, संरक्षण, विकास संबंधी इतर बाबी राज्य शासनाकडून ठरविण्यात येतील त्यासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत आयोग कार्यरत आहेत. राज्य आयोगाचे अध्यक्ष आनंदराज अडसूळ यांना राज्य मंत्रिपदाचा दर्जा दिल्याबद्दल त्यांनी राज्य शासनाचे आभार मानलेआहे.



> गोष्टी नशिबावर सोडायच्या यावर माझा विश्वास नाही. कठोर मेहनत आणि तयारीवर माझा विश्वास आहे.
>
> - रतन टाटा
> प्रसिद्ध उद्योगपती



वृत्तमानस
मुंबई, शुक्रवार, ११ ऑक्टोबर २०२४

# टाटांना गरिबांकडून 'टाटा'

ज्यांची विश्वरत्न म्हणून ओळख असावी असे भारताचे रत्न अखेर अनंतात विलीन झाले. केवळ भारतानेच नव्ह तर संपूर्ण जगाने ज्यांचे कौतुक करावे त्यांच्या वागण्याचे अनुकरण करावे अशी ही महान व्यक्ती भारतातील तमाम तरुणांना पोरके करून गेली. उद्योग धंद्यात उतरू पाहणाऱ्या स्वतःच्या पायावर उभे राहू पाहणाऱ्या तरुणांसाठी रतन टाटा एक ऊर्जा होती. संस्कृतीचा आणि मानवतेचा महामेरू म्हणून त्यांना ओळखले जायचे. अशा या भारत पुत्राने जगाचा निरोप घेतला. त्यांच्या जाळाने भारताची जी हानी झाली आहे ती भरून निघणे शक्य नाही. कारण कलयुग म्हटल्या जाणाऱ्या या देशातील ग्राहक वर्गाची लूट करून गडगंज संपत्ती जमविणाऱ्यांपैकी रतन टाटा बिलकुल नव्हते. त्यांच्या देशासाठीच्या कार्याला तोड नाही. गेल्या काही दशकांपासून भारतात उभे राहिलेल्या काही उद्योगपतींकडून उद्देश लुटायला घेतला आहे. कोरोना सारख्या महामारी सुद्धा मयताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचे काम केले आहे. या महामारीच्या संकटाला संधी समजून लोकांच्या खिशात हात घालणारे व्यापारी आणि या महामारीला संकट समजून गरिबांसाठी स्वतःचा खजिना रिकामे करणारे रतन या देशातील तमाम कामगार तिकीट गरिबांचे रत्न होते. भारताच्या उद्योग क्षेत्रातील बापमाणूस, प्रसिद्ध उद्योगपती म्हणून त्यांची सातासमुद्रापार ख्याती होती. त्यांना रविवारी रात्री उशिरा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रक्तदाबाचा त्रास जाणवू लागल्याने ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होती. सोमवारी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास स्वतः ट्विट करत त्यांनी देश वासियांना आपल्या प्रकृतीची मीहिती दिली होती. "माझ्या प्रकृतीविषयी अफवा पसरली आहे. पण माझे वय लक्षात घेता आणि सध्याची माझी प्रकृती पाहता माझ्या काही वैद्यकीय तपासण्या केल्या जात आहेत. त्यामुळे काळजी करण्यासारखं कोणतेही कारण नाही"असे टाटा म्हणाले होते. टाटा यांना दाखल केल्याची बातमी समोर आल्यानंतर तिसऱ्या दिवशी संध्याकाळी त्यांची प्रकृती जास्त खालावल्याची माहिती समोर आली. प्रकृती खालावल्यामुळे रतन टाटा यांना ब्रीच कँडी रुग्णालयात आयसीयूत दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आणि गुरुवारी त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे नाव भारताच्या उद्योग क्षेत्रात अभिमानाने घेतले जाते. त्यांनी फक्त उद्योग क्षेत्रात नाव कमवले असे नाही तर त्यांनी माणसे जपली. कोरोना काळात देशावर मोथे संकट कोसळले होते, त्यावेळी टाटा यांनी आपल्या हॉटेल्स राज्य सरकारला रुग्णांना क्वारंटाईन करण्यासाठी मोफत दिले होते. तर दुसरीकडे याच काळात काही उद्योगपतींनी देशात लुटमार सुरू केली होती. टाटा यांच्या मदतीमुळे राज्यातील कोट्यवधी नागरिकांना मोठी मदत झाली होती. त्यांच्याकडे एक खरे देशभक्त म्हणून पाहिले जायचे. त्यांच्याकडून प्रचंड सामाजिक कार्यदेखील झाले. याशिवाय त्यांनी टाटा ग्रुपच्या विविध कंपन्यांना यशाच्या सर्वोच्च शिखरावरही पोहोचवले. त्यामुळे रतन टाटा यांचं नाव उद्योग क्षेत्रासोबतच सर्वसामान्यांमध्येदेखील आदराने घेतले जाते. अशा या दिग्गज उद्योगपतीचं निधन झाल्याने देशभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. टाटा समूहाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर उपकंपन्यांच्या प्रमुखांकडून त्यांना तीव्र प्रतिकाराचा सामना करावा लागला होता. त्या सर्व गोष्टींचा प्रतिकार करत त्यांनी जनहित जपण्याचे काम कधीच सोडले नाही. उद्योगक्षेत्रात सर्वांची मने जिंकली. ते एक माणूस म्हणून श्रेष्ठ व्यक्तीमत्व होते. त्यांनी आपल्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा विचार केला. ते आपल्या कंपन्यांमधील कनिष्ठ पातळीवरील कर्मचाऱ्यांच्या थेट संपर्कात जाण्याचा प्रयत्न करायचे. त्यांनी अनेकदा कर्मचाऱ्यांशी तसा संवादही साधला. ते कर्मचाऱ्यांच्या हितासाठी प्रचंड काम करायचे. त्यांच्या प्रेमामुळे कर्मचारीदेखील टाटा यांच्यावर तितकाच प्रेम करायचा. टाटा यांनी केलेल्या विविध सामाजिक कार्य आणि उद्योग क्षेत्रातील कार्यामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. दुर्दैवाने या महान व्यक्तिला त्यांच्या हयातीत भारतरत्न न मिळाल्याची खंत त्यांच्या चाहत्यांना, देहाभक्तांना नक्की वाटत असेल. 2000 मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने आणि 2006 मध्ये महाराष्ट्र सरकारच्या सर्वोष्ठ मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले होते. परंतु त्याही उपर जाऊन त्यांना भारतरत्न देणे क्रमप्राप्त होते. आजवर अनेक हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहेत जे हयात आहेत. त्यांचे कार्य नक्कीच मोठे होते म्हणून ते भरारत्नचे मानकरी झाले, पण टाटा यांना देखील ह सन्मान त्यांच्या हयातीत मिळणे आवश्यक होते. अर्थात या देशातील समाजसेवा करण्याचे काम त्यांनी कोणत्याही पुरस्कारासाठी केलेले नाही. म्हणूनच ते विश्वरत्न ठरतात. त्यांना 2023 मध्ये ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया या पुरस्कराने देखील सन्मानित करण्यात आले होते. अशा अनेक पुरस्कारांनी रतन टाटा यांना देशात आणि विदेशात सन्मानित करण्यात आले होते. माध्यमांसोबत बोलताना टाटा उद्योग समुहातील कंपन्यांतील कामगारांनी आपल्या भावना व्यक्त करत काम आजही चालू ठेवण्या मागचे कारण सांगितले. हजारो कर्मचारी काम करत असलेल्या या टाटा मोटर्सच्या प्लांटमध्ये आजही काम बंद ठेवण्यात आलेले नाही. कारण, 'मी गेल्यानंतरही कंपनी सुरू ठेवा. देशाचे, कामगारांचे नुकसान व्हायला नको असे स्वतः टाटांनी इथल्या कर्मचाऱ्यांना सांगितले होत. म्हणूनच त्यांच्या सूचनेनुसार त्यांच्या अंत्यविधीच्या वेळीही कामगार कंपनीत काम करत होते. असा मालक होणे नाही. अशा भावना कामगारांनी व्यक्त केल्या. पिंपरी चिंचवड शहरातील टाटा मोटर्स युनिटमधील कामगारांनी उद्योगपती रतन टाटा यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा अशी मागणी केली आहे. रतन टाटा यांनी पिंपरी चिंचवडमधील टाटा मोटर्स प्लांटमध्येच निवृत्ती घोषित केली होती, याची आठवणही कर्मचाऱ्यांनी काढली. टाटा प्लांटमधील कर्मचाऱ्यांनी रतन टाटांसोबतच्या आठवणी जाग्या केल्या. टाटा मोटर्सच्या पिंपरी चिंचवड येथे रतन टाटा नेहमी यायचे, इथल्या प्रत्येक कामगाराला ते भेटायचे त्यांच्याशी बोलायचे माध्यमांसोबत बोलताना कामगार म्हणाले," आमच्यासाठी हा खूप दुःखद दिवस आहे. या दिवसाचा आम्ही कधी विचारही केला नव्हता. टाटा मोटर्सचे अनेक प्लांट आहेत, मात्र पुण्याच्या ठिकाणाची एक वेगळी ओळख होती. रतन टाटा जेव्हा इथे यायचे, तेव्हा ते पहिल्यांदा आपली इच्छा व्यक्त करायचे. ते कामगार युनियनचा खूप आदर करत होते, त्यांनी त्यांच्या निवृत्तीची घोषणा इथेच केली, आम्ही त्यांचा वारसा सुरू ठेवू इच्छितो, त्यांनी कोविडच्या काळात जे केले ते आम्ही कधीही विसरू शकत नाही, असे सांगत कर्मचारी भावूक झाले. टाटा साहेब गेल्यामुळे आम्ही अनाथ झालो' असे कर्मचारी बोलत होते. यावरूनच त्यांच्या कामाची आणि कर्मचाऱ्यांच्या प्रती असलेली अस्था दिसून येते. टाटा यांनी देशभरात जय मोठे कार्य उभे केले आहे त्या कार्याला पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आता इतर उद्योगपतींनी घ्यायला पाहिजे. उद्योग हा पोटापुरता असला पाहिजे. व्यापाराच्या नावे देशातील जनतेची लूट करणारे श्रीमंत जरूर होतील परंतु जो सन्मान, जे प्रेम टाटांना मिळाले आहे तशा प्रेमाचे मानकरी मात्र त्यांना होता येणार नाही. अनेक सन्मान हे मिळते परंतु सुद्धा सन्मानामध्ये जनतेच्या मनात मात्र आपुलकी नसेल. इतर उद्योगपतींनी श्रीमंत व्हायचे की टाटां सारखे सन्मानास पात्र हे ज्याचे त्याने ठरवावे.

# 'बेस्ट'मधील सेवानिवृत्तांचे प्रश्न...

**बेस्ट उपक्रमाच्यावतीने निवृत्त अधिकारी / कामगार यांना त्यांचे उपदान वेळेवर मिळत नाही त्यामुळे त्यांना मानसिक तसेच आर्थिक त्रास देण्याच्या बेस्ट प्रशासनाच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी ठिय्या आंदोलनाची सुरुवात करण्यात येत आहे.**

(१) बेस्ट उपक्रमातील अधिकारी / कामगार यांना प्रचलीत असणाऱ्या प्रथेनुसार सेवा निवृती पूर्वी बेस्ट प्रशासनाच्यावतीने पत्र देऊन सदर कामगार, त्यांच्या कुटुंबियाना सेवा निवृती नंतर त्यांचे, कुटुंबियाचे आयुष्य सुखाचे, समाधानाचे, समृद्धीचे, आरोग्यदायी जावो अशी सदिच्छा व्यक्त करण्यात येते. प्रत्यक्षात निवृती धारकाना निवृती नंतरचे फायदे विलंबाने मिळत असल्याने त्यांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. न्यायालयीन प्रकरणामुळे शासनाच्या वेळेचा व पैशाचा अपव्यय होत आहे. सदर रकमा उशिरा अदा केल्यामुळे सदर रक्कमावर व्याज प्रदान करावे लागत आहे, न्यायालयीन प्रकरणाची संख्याही वाढत आहे, असे मत, संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांच्या १२.१०.२०१८ च्या परिपत्रकान्वये व्यक्त केले आहे. बेस्ट प्रशासन हा सार्वजनिक उपक्रम असल्याने सदर मताशी सहमत असेल असे वाटते, परंतु बेस्ट प्रशासनाची, प्रामुख्याने विधि, लेखा, कर्मचारिय विभाग यांची कृती ही वरील मताच्या विसंगत आहे.

(२) आम्ही महाव्यवस्थापकांचे लक्ष, त्यांना दिलेल्या कागद पत्राकडे वेधत आहोत. सोयीसाठी त्याचे विविध विभाग केलेले असून, अधिकारी / कामगार यांना निवृती नंतर आर्थिक फायदे देणे बेस्ट प्रशासनास अडचणीचे आहे का? या प्रश्नाचे उत्तर खालील कारणास्तव नकारार्थी मिळेल. बेस्ट उपक्रमातील सर्व अधिकारी / कामगार यांना त्यांच्या सेवा समाप्तीनंतर त्वरित देय असणारे, उपदान, रजेचा पगार, थकबाकी आदी फायदे देणे खालील कारणास्तव सहज शक्य आहे,

(३) उपदान प्रदान अधिनियम १९७२ मध्ये कलम ४ ओ हे दिनांक ०१.१०.१९८७ पासून अधिनियमात समाविष्ट करण्यात आले. सदर अधिनियमानुसार बेस्ट उपक्रमाने बेस्ट उपक्रमाच्या अर्थ संकल्पात "सेवकवर्गास विशेष भविष्य निधि" ची स्थापना करण्यात आली असून सन २०१२-२०१३ पासून सदर अर्थ संकल्पात अर्थसंकल्पीय वर्षात निवृत्त होणाऱ्या कामगारांची संख्या विचारात घेऊन आवश्यक ती तरतूद करण्यात येते असा दावा केला आहे. (४) मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त प्रवीण परदेशी यांच्या पूर्व संमतीने ११.०६.२०१९ रोजी झालेल्या सामंजस्य करारातील बाब क्र. १० म्हटले आहे.

ते असे, (10. It is agreed to pay balance amount of retirement benefits before September 2019 to the employees who have already retired and thereafter immediately on retirement.) सेवा समाप्ती नंतर कामगारांना उपदानाची तसेच अंतिम यकाची (retirement Benefits) रक्कम त्वरित दिली जाईल अशी स्पष्ट कबुली आहे. परंतु कार्यवाही नाही. (५) उपदान प्रदान अधिनियम १९७२ कलम ७ पोट कलम ३ अनुसार Employer shall arrange to pay the amount of gratuity ही तरतूद अनिवार्य आहे. वादाकरीता वरील परिच्छेदतील तरतुदीची कार्यवाही करताना आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्यास मालक या नात्याने बेस्ट प्रशासनाने पर्यायी तजवीज करणे बंधनकारक आहे. (६) अधिनियम १९७२ कलम ४ ओ पोट कलम ५ मधील shall be liable to pay the amount of gratuity due under this Act (including interest if any, for delayed payment) forthwith. (६.१) बेस्ट उपक्रमाच्या वतीने उपदानाच्या रक्कमेसोबत काही अपवाद वगळता विलंबाने दिलेल्या उपदानाच्या रक्कमेसोबत कधीही व्याज दिलेले नाही. आम्ही आता कामगाराच्या सेवा समाप्तीची तारीख ते उपदानाची दिलेली रक्कम या कालावधीसाठी वर नमुद केल्याप्रमाणे १८% व्याज आणि उपदानाची रक्कम मिळाल्याची तारीख ते व्याजाची रक्कम मिळालेल्या तारखेपर्यंत व्याजाच्या रक्कमेवर १२% व्याज मिळावे यासाठी न्यायालयात आग्रही रहाणार आहोत. (७), विलंबाने दिलेल्या व्याजाच्या रक्कमेवर निर्माण केलेला वाद खालील तसेच अन्य करणास्तव निरर्थक आहे.

(७.१) केंद्र शासनाच्यावतीने उपदान प्रदान अधिनियम २००५ अंतर्गत केंद्र शासनाने १.१०.१९८७ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार व्याजाचा दर १०% आहे. बेस्ट प्रशासनाने सदर शासन निर्णयात बदल करावा म्हणून नगर विकास विभागाकडे ०३.०९.२०२१ रोजी निवेदन पाठविले आहे. सदर निर्णयाच्या शेवटच्या परिच्छेदा मध्ये.

In view of above, may I request your goodself to initiate needful steps for moving the appropriate authority in Government for issuing the Notifications afresh in exercise of the powers conferred under sub-section 3-A of Section 7 and Section 8 of the Payment of Gratuity Act, 1972, specifying therein the simple interest and compound interest, respectively, applicable at reduced rates from the date of its publications in the Official Gazette. असे म्हटले आहे.

या परिच्छेदातील शेवटचे वाक्य स्पष्टपणे नमुद करते की, सुधारीत व्याजाचा दर हा सुधारित शासन निर्णय अंमलात आल्यानंतर कार्यान्वीत होईल. तसेच सदर बाब हे स्पष्ट करते की सर्व निवृत्त कामगारांना सध्याच्या शासन निर्णयानुसार १०% व्याज देणे अनिवार्य आहे.

(७.२) बेस्ट उपक्रमातील सेवा निवृत्त अधिकारी व कामगार यांना ०७.०८.२०२१ पर्यन्त विलंबाने दिलेल्या व्याजच्या रक्कमेवर १०% दराने व्याज देण्यात येत होते अशी माहिती सिनकर यांना देण्यात आली. सदर माहिती महाव्यवस्थापकांना सोबत जोडलेल्या कागदपत्रात आहे. सदर कालावधी मर्जीतील निवृत्त अधिकारी / कामगार यांना देण्यात आली. त्यानंतर दिनांक ३.०९.२०२१ रोजी तत्कालीन महाव्यवस्थापक यांनी नगर विकास विभागाला पाठविलेल्या निवेदनाला अनुसरून व्याज न देण्याचा निर्णय मागे घेऊन तत्पूर्वीची १०% व्याज देण्याची प्रथा चालू करणे उचित होते / आहे. (७.३) कामगारांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात विधि विभागाकडून प्राप्त झालेली माहिती सोबत जोडलेली आहे. कामगार न्यायालयाने विलंबाने दिलेल्या रक्कमेवर १०% व्याज या निर्णयाला बेस्ट प्रशासनाने औद्योगिक न्यायालयात दिलेल्या आव्हान संपुष्टात आलेले आहे. बेस्ट उपक्रमाच्यावतीने १६७ याचिका दाखल करण्यात आलेल्या असून सर्व याचिका व्याजाच्या निर्णयाला आव्हान देण्यात आलेले आहे. अधिकारी / कामगारांच्यावतीने अंतिम देयकाच्या संदर्भात एकत्रित याचिका दाखल केलेली असून मुंबई उच्च न्यायालयाने ग्राह्य धरलेल्या असताना मालकाच्या वतीने वेगवेगळ्या याचिका करण्या मागील अर्थशास्त्र / हेतु समजलेला नाही. (७.४) बेस्ट उपक्रमाच्या वतीने या पूर्वी मुंबई उच्च न्यायालयात प्रकरण सूनावणीसाठी येण्यापूर्वी प्रतीवादी कामगारास पूर्व सूचना देण्यात येत होती. याबाबत आपणाकडे तसेच बेस्ट प्रशासनाच्या संबंधित सॉलिसिटर्स फर्मच्या निदर्शनास आणून सुद्धा संबंधित कामगाराना पूर्व सूचना न देता मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीसाठी देण्यात येतात.(७.५) औद्योगिक न्यायालयातील काही प्रकरणात उच्च न्यायालयात याचिका केलेली नसतानाही सदर आदेशाची अंमल बजावणी करण्यात येत नाही.

(८) मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी त्यांच्या २९.११.२०१९ च्या परिपत्रकात काही मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून निरर्थक प्रकरणाना संबंधित अशा अधिकाऱ्यांकडून न्यायालयीन खर्च वसूल करण्याची तरतूद केली आहे. सदर आदेशाची बेस्ट उपक्रमाकडून अंमलबजावणी झाल्यास न्यायालयीन खर्चावर मर्यादा येतील. (९) या पूर्वी सेवा निवृत्त अधिकारी / कामगार आणि त्यांच्या कुटुंबियानी बेस्ट उपक्रमा कडून भरपूर यातना सोसल्या. आम्ही आता स्वस्थ बसणार नाही. पुढील आंदोलन अधिक तीव्र होईल याची प्रशासनाने बेस्ट उपक्रमाच्या "बेस्ट" या नावास काळीमा लागणार नाही याची दाखल बेस्ट प्रशासनाकडून घेतली जावी अशी अपेक्षा आहे.

- सु. शां. नलावडे,
सरचिटणीस,
बेस्ट जागृत कामगार संघटना
बेस्ट उपक्रम

## पत्र मानस

### रावण दहन योग्यच !

साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त असलेल्या विजयादशमी सणाचे हिंदू धर्मात विशेष महत्व आहे, याच दिवशी प्रभू श्री रामचंद्रांनी लंकापती रावणाचा वध करून एक नवा पायंडा जगासमोर ठेवला. प्रकांड पंडित असलेला रावण मोठा शिवभक्त होता त्यामुळे त्याला मानणारा समाज आजही श्रीलंकेत दिसून येतो; मात्र रावण हा स्त्रीलंपट होता आणि त्याने सीताहरणाच्या आधीही अनेक स्त्रियांना पळवून आणून त्यांचा उपभोग घेतला असल्याची अनेक उदाहरणे रामायणाचा अभ्यास केल्यावर आपल्या लक्षात येतील. एका अप्सरेचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्यावर रावणाला ब्रह्मदेवाकडून शाप मिळाला होता, की यापुढे त्याने कोणत्याही स्त्रीचा बळजोरीने उपभोग घेण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्या मस्तकाची शेकडो शकले होतील. याशिवाय सीतेच्या पातिव्रत्यामुळे रावणाला सीतेला स्पर्श करणे नंतर कधीच शक्य झाले नाही. रावणाची दुष्कर्मे जाणून घ्यायची असतील तर आधी रामायणाचा अभ्यास करायला हवा. विजयादशमी जवळ आली कि काही नास्तिक विचारसरणीची पुरोगामी मंडळी रावण हा दानशूर ब्राह्मण होता. त्याने केवळ आपल्या बहिणीच्या अपमानाचा सूड म्हणून सीतेचे हरण केले; मात्र सीतेचा शीलभंग करण्याचा त्याने कधीच प्रयत्न केला नाही त्यामुळे त्याचे दरवर्षी प्रतीकात्मक दहन करणे चुकीचे असल्याचे बरळू लागतात. भारतीय संस्कृतीशी अथवा येथील पौराणिक संदर्भांशी काही देणेघेणे नसलेली ही मंडळी हिंदूंच्या सण उत्सवांमध्ये आडकाठी आणण्यासाठी लोकांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करत असतात. दरवर्षी विजयादशमीच्या दिवशी केले जाणारे रावण दहन हे सत्प्रवृत्तीने दुष्प्रवृत्तीवर, सत्याने असत्यावर मिळविलेल्या विजयाचे प्रतीक असून या प्रथेला विरोध करण्याचे काहीच कारण नाही.

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

### देशाभिमानी व्यक्तीमत्व

देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारा देवमाणूस देशाला सोडून गेला. आपले कार्य आणि लोकभावना समजून घेणारा उद्योगपती पुन्हा आपल्या देशात होणे नाही. भारताच्या उद्योगविश्वातील भारतरत्न निखळले. शालीन आणि सुसंस्कृत स्वभावासाठी ओळखल्या जाणाऱ्या रतन टाटा यांच्या निधनाने उद्योगविश्वासह संपूर्ण विश्वात आज हळहळ व्यक्त केली जात आहे. यशस्वी करकिर्द आणि उद्योग जगतातील देदिप्यमान इतिहास हा देश आणि संपूर्ण जग कधीही विसरणार नाही. शिक्षणापासून ते आरोग्यसेवेपर्यंत, त्यांच्या पुढाकारांनी खोलवर रुजलेली छाप सोडली आहे, ज्याचा फायदा येणाऱ्या पिढ्यांना होईल. त्यांचे योगदान त्यांच्या व्यवसायापलीकडे गेले होते. नम्रता, दयाळूपणा आणि आपल्या समाजाला अधिक चांगले बनविण्याच्या अतूट बांधिलकीमुळे ते लोकप्रिय होते. देशावर ओढवणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवी अशा प्रत्येक संकटावर मात करण्यासाठी सदैव मदतीचा हात देणे हा रतन टाटा यांचा स्वभाव सदैव स्मरणात राहील. देशभक्ती व देशहिताचे आदर्श उदाहरण म्हणजे अनमोल रत्न रतन टाटा.देशात त्यांची कारकिर्द जगाला दिसावे व पुढच्या पिढीला पाहावे यावे असे एक म्युझियम उभारावे.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### जम्मू-काश्मीर विधानसभा यश हा लोकशाहीचा विजय

जम्मू-काश्मीर विधानसभेतील नॅशनल कॉन्फरन्स पक्षाला ९० पैकी ४२ जागा मिळाल्या. ३७० वे कलम रद्द केल्यानंतर खऱ्या अर्थाने लोकशाहीचा विजय झाला आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. याचे कारण लोकशाही पद्धतीने शांतता पूर्ण वातावरणात प्रथमच निवडणुका पार पडल्या आहेत. आता कॉंग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स आघाडीची सत्ता सत्तेवर येणार आहे. भारतीय संविधानाप्रमाणे चालणाऱ्या भारतीय नागरिकांना भारताच्या कानाकोपऱ्यात जायला बंदी करता येत नाही हाच नियम जम्मू काश्मीरला लागू होणार आहे. तसेच आता जम्मू-काश्मीरमध्ये जाणे, नोकरी करणे, जमीन घेऊन राहणे शक्य होणार आहे. जम्मू - काश्मीर मधील प्रमाणा बाहेर वाढत असलेली मादक पदार्थांची तस्करी रोखावी लागणार आहे. महागाईला सुद्धा आळा घालावा लागणार आहे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर. अंधेरी**

### असे सोहळे ऑनलाइन करण्यात यावे.

रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या लाडकी बहिण योजना वचनपूर्ती सोहळयासाठी एसटी बसने येत असलेल्या लाडक्या बहिणींची एसटी बस मांजरोणे घाटात कोसळल्यामुळे एक महिला गंभीर जखमी झाली तर अन्य १९ महिला किरकोळ जखमी झाल्याची बातमी वाचनात आली. लाडकी बहिण योजना लागू केल्यापासून राज्यभर असेच सोहळे आयोजित केले जात आहेत. त्यासाठी हजारोंच्या संख्येने आजूबाजूच्या परिसरातून लाभार्थींना कार्यक्रमस्थळी आणण्यात येते. समाजमाध्यमांवर, वर्तमानपत्रांत जाहिरातींचा भडीमार करत असताना, लाडक्या बहिण योजनेचे अनुदान बॅंक खात्यात थेट जमा होत असताना असे सोहळे आयोजित करण्याचा अट्टाहास का? हा अट्टाहासच माणगावमधील लाडक्या बहिणींच्या जीवावर बेतला होता असे म्हटल्यास त्यात चूक ते काय? तसेच लाडक्या बहिणींना कार्यक्रमस्थळी आणण्यासाठी कित्येक एसटी बस आरक्षित केल्या जातात. त्याचा फटका स्थानिक प्रवाशांना होतो. एसटी बस आगारात उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा खोळंबा होतो. त्यांना हा मन:स्ताप कशासाठी? असे सोहळे आयोजित करण्यापेक्षा ऑनलाइन सोहळे करुन त्याचे थेट प्रक्षेपण विभागाविभागात करण्यात यावे.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### चीनने तरुणाची लग्ने जमविण्यासाठी सुरु केले मॅरेज डिग्री कोर्सेस

चीनला आता कमी जन्मदराने पछाडले आहे . एकेकाळी चीनमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या होती . आता भारत हा सर्वात जास्त लोकसंख्येचा देश झाला आहे . चीनमध्ये आता मुलं नको ही मानसिकता आत्ता पराकोटीला गेली आहे . सरकारने अनेक प्रोत्साहनात्मक योजना मुले जन्मला घालावीत म्हणून कार्यान्वित केल्या तरीपण त्याला फारसे यश येताना दिसत नाही . या वर्षीच्या पहिल्या सहामाहीत गेल्या सुमारे ११ वर्षातील सर्वात कमी लग्नदर आहे ही बातमी नुकतीच वाचली . २०१३ नंतर सर्वात लग्न कमी अशी परिस्थिती प्रथमच निर्माण झाली आहे . चीनच्या विद्यापीठांनी यावर एक डिग्री कोर्स ची निर्मिती केली असून त्याचे नाव मॅरेज सर्विस अँड मॅनेजमेंट असे आहे . या कोर्समध्ये कुटुंब समुपदेशन, उच्चस्तरीय विवाह योजना आणि मॅचमेकिंग असे विषय शिकविले जाणार आहेत . याची सुरवात चीन आपल्या १२ राज्यातून करणार आहे . लग्ने कमी होतायेत याचे महत्वाचे कारण म्हणजे चीनची मंदगतीने चालणारी अर्थव्यवस्था व वाढती महागाई ही सुद्धा आहेत . मागील वर्षापेक्षा सुमारे ४. ९ लाख एवढी कमी लग्ने पहिल्या सहामाहीत झाली आहेत आता कॉलेज मध्ये डिग्री कोर्से स मुळे लग्नदरात काय फरक होतायेत हे कळण्यासाठी आणखी एक दोन वर्षे तरी जावी लागतील . एकूणच चीनमध्ये लग्न हा प्रश्न अत्यंत अवघड झाला आहे सरकार अनेक योजना आणत आहे पण लोकांचा फारसा प्रतिसाद मिळत नाही आज जपान मध्ये सुद्धा हाच प्रश्न समोर येत आहे भारतात अजून तरी ही परिस्थिती नाही ही समाधानाची बाब आहे

**- शांताराम वाघ पुणे**

### पत्रकारांसाठी महामंडळ हा फक्त निवडणूक जुमला

पत्रकार संरक्षण कायद्याचं नोटिफिकेशन काढून राज्यात पत्रकार संरक्षण कायदा लागू करण्यास टाळाटाळ केली जात आहे, पत्रकार पेन्शन योजनेसाठी अनेक ज्येष्ठ पत्रकारांचे अर्ज तांत्रिक दोष काढून हेतूत:प्रलंबित ठेवले जात आहेत, पेन्शनची रक्कम 11,000 वरून 20,000 करण्याची घोषणा तर केली गेली मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही, मजेठिया वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केली जात आहे, अधिस्वीकृती पत्रिका धारकाच्या रेल्वेसह अनेक सवलती रद्द केल्या गेल्या आहेत, साप्ताहिकं आणि छोटी दैनिकं बंद पडतील असं वृत्तपत्र धोरण आखलं जात आहे,.. चांगल्या युट्यूब चॅनल्सना सरकारी जाहिराती सुरू करा, त्यांना अधिस्वीकृती द्या या मागण्यांकडे दुर्लक्ष केलं जात आहे. या सर्व बुनियादी प्रश्नांची उपेक्षा करून सरकार आता पत्रकारांसाठी महामंडळ स्थापन करायला निघालं आहे.. हा केवळ निवडणूक जुमला आहे..होणार काही नाही.. याचं कारण पत्रकारांचे प्रश्न सुटले पाहिजेत असं सरकारला मुळी वाटतंच नाही.. महामंडळ स्थापन करून पत्रकारांचे प्रश्न सुटतील असं आम्हाला वाटत नाही.. विविध क्षेत्रातील लोकांसाठी अगोदरच राज्यात 55 महामंडळं आहेत, या महामंडळाची काय अवस्था आहे आणि त्यातून किती लोकांचे कोट कल्याण झाले म्हणून महामंडळाने पत्रकारांचे होणार आहे? "पांढरे हत्ती" अशीच या सर्व महामंडळाची ओळख आहे.. गोदी मिडियातील काही लोकांची सोय करणे एवढाच या घोषणेचा अर्थ असू शकतो. . कोणी केली होती ही मागणी..? राज्यातील कोणत्याही प्रमुख पत्रकार संघटनेनं ही मागणी केलेली नाही किंवा कोणत्याही प्रमुख पत्रकार संघटनेशी सरकारने यासंदर्भात चर्चा, विचारविनिमय केलेला नाही.. त्यामुळे निवडणूक काळात पत्रकारांसाठी ही आम्ही काही करतो आहोत एवढायापुरताच आमच्या लेखी या घोषणेला अर्थ आहे... पत्रकारांना गाजर दाखविण्याचा प्रयत्न या घोषणेच्या माध्यमातून सरकारनं केला आहे.. "प्रेस कॉन्सिल ऑफ इंडिया" च्या धर्तीवर महाराष्ट्रात प्रेस कॉन्सिल स्थापन करावी अशी पत्रकार संघटनांनी विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना मागणी केली होती.. विलासराव देशमुख त्याबाबत सकारात्मक होते.. मात्र तेव्हा ते झाले नाही.. नंतरही महत्वाच्या पत्रकार संघटना याचा पाठपुरावा करीत राहिल्या परंतू त्याकडे सत्ताधारी पक्षांनी दुर्लक्ष करून महामंडळासारखी सवंग घोषणा आज सरकारने केली आहे.. पत्रकारांना कामगारांच्या श्रेणीत लोटणयाचा प्रयत्न सरकार करीत आहे..यातून पत्रकारांच्या हाती काही लागणार नाही हे स्पष्ट आहे.. आम्हाला हे महामंडळ मान्य नाही

**- एस.एम.देशमुख, मुंबई**

# पालिका कर्मचाऱ्यांना 33 हजार सानुग्रह अनुदान जाहीर

**नवी मुंबई :** दिवाळी सण 29 ऑक्टोबरपासून सुरू होत असून नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांची दिवाळी आनंदात जावी याद‍ृष्टीने सन 2023-24 या वर्षाकरिता महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी यांना रू. 33 हजार तसेच करार / तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचारी यांना रू. 27 हजार आणि आशा वर्कर यांना रु.17 हजार रक्कमेचे सानुग्रह अनुदान जाहीर केलेले आहे. यामध्ये महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी. प्राथमिक व माध्यमिक शिक्षक यांना रू. 33 हजार सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे ठोक मानधनावर, किमान वेतनावरील तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीवरील वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असणारे अधिकारी - कर्मचारी, रोजंदारीवरील आरोग्य सेवक, मानधनावरील बालवाडी शिक्षक व मदतनीस यांना रू. 27 हजार इतकी सानुग्रह अनुदान रक्कम प्रदान केली जाणार आहे.



# गिरीश महाजन 'पांचट'मोचक तर येवल्यातील नेता डुप्लिकेट

प्रतिनिधी
■ जालना

राज्य सरकारने ओबीसींच्या यादीत नव्या 15 जाती समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे केली आहे. यावरुन मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकारवर सडकून टीका करत अनेक प्रश्न विचारले आहेत. आता ओबीसी नेते कुठे झोपले आहेत. येवल्याचा डुप्लिकेट नेता कुठे गेला? आता या जातींना विरोध का नाही? असा सवाल करत मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला आहे. ज्या जातींचा ओबीसीत समावेश करत आहात, त्याबाबत महाविकास आघाडीकडून लिहून घेतले का? असा सवाल जरांगेंनी विचारला. तसेच गिरीष महाजन भाजपचे पांचट मोचक असल्याची टीका जरांगे यांनी आज जालन्यातील पत्रकार परिषदेत केली.



मनोज जरांगे म्हणाले, मराठे आता शहाणे होतील. मराठ्यांचे डोळे उघडणे गरजेचे होते. सरकारने या जातींना ओबीसीत घेताना महाविकास आघाडीकडून लिहून घेतले आहे का? हे एकमेकांना लिफ्ट देत आहेत. मराठ्यांना आरक्षण देताना यांना त्रास होतो. एवढा जातीवाद कशासाठी? असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

मनोज जरांनी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही निशाणा साधला. त्याला काय कळत हेंद्रा आहे तो.... त्याने मराठ्यांचा खेळ संपवला. त्याने काय नेरेटिव्ह सेट केला? आमच्या लोकांना पंधराशे रुपये देतो आणि इतर जातींना आयुष्यभराचे आरक्षण देणार, हे योग्य नाही. फडणवीस यांनी मराठ्यांवर काही उपकार केले आहेत का? उघड्या डोळ्यांनी तुम्ही मराठ्यांचा घात केला. जातवान मराठे तुमचा भुगा करणार, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी फडणवीसांवर हल्लाबोल केला. आमच्या समस्या अशाच राहिल्यानंतर, आम्ही सण कसे साजरे करणार? असा प्रश्न जरांगे यांनी विचारला आहे.

मनोज जरांगे यांनी गिरीष महाजन यांच्यावरही निशाणा साधला. गिरीष महाजन भाजपचे पांचट मोचक आहेत. यांनीच या जाती ओबीसीत घेतल्या आहेत. ओबीसीत घेतलेल्या जाती गिरीष महाजन यांच्या जातीच्या उपजाती आहेत, असे मनोज जरांगे म्हणाले.

सगळीकडे मराठ्यांचे मतदान असून प्रत्येक मतदारसंघात एक-एक लाख मतदान आहे. यांना आधी हिंदुत्व म्हणण्याची सवय आहे. पण आता हे कुणाचे आहेत? असा पेच हिंदू संघटनांसमोर आहे.

# मागासलेल्यांना हक्क मिळवून देणारे ब्राह्मण ओबीसींचे शत्रू नाहीत

प्रतिनिधी
■ नांदेड

ओबीसीचा शत्रू हा ब्राम्हण नाही. ब्राह्मण आपले उच्च शिक्षणाच्या जोरावर जगाच्या प्रगत देशांमध्ये गेलेला आहे. तो आपल्या हक्कासाठी भांडत बसला नाही तर तो इतरांना आपला हक्क देणारा ब्राह्मणच होता, असे ओबीसी आंदोलनाचे नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.

दरम्यान लक्ष्मण हाके पुढे बोलताना म्हणाले की, आजचा जो महाराष्ट्र आहे तो फक्त काही ठराविक लोकांचा वतनदारांचा आणि दरोडेखोरांचा महाराष्ट्र पहायला मिळत आहे, असा आरोप हाकेंनी हदगाव तालुक्यातील सभेनंतर बोलताना केला आहे.

प्रा. लक्ष्मण हाके पुढे बोलताना म्हणाले की, ओबीसीचा खरा शत्रू ब्राम्हण नाही.ओबीसीचा खरा शत्रू महाराष्ट्र लाटणारा आमदार, खासदार, वतनदार, दरोडेखोर,यांची टोळी आहे. ब्राम्हण हा आज शिक्षणाच्या जोरावर प्रत्येक प्रगत देशामध्ये गेला. तो इथे भांडत बसला नाही. जो मागासलेला होता, त्याला त्याचा हक्क मिळवून देणारा हा ब्राम्हणच होता. पण, आजचा जो महाराष्ट्र बघायला मिळतोय, फक्त काही ठराविक लोकांचा वतनदारांचा आणि दरोडेखोरांचा महाराष्ट्र पहायला मिळत आहे



शरद पवार, उद्धव ठाकरे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण असे सर्वपक्षीय नेते जरांगे पाटील यांना पाठींबा देतात हे दुर्दैव आहे, या सगळ्यांविरोधात उमेदवार उभे करणार अशी प्रतिक्रिया ओबिसीचे आंदोलक आणि नेते प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी दिली. देगलूर येथे आयोजित मेळाव्यासाठी हाके आज नांदेडमध्ये आले होते. यावेळी त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी नाशिकमधील डॉक्टरवर शाईफेक करण्यात आली आहे. यावर बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले की, महाराष्ट्रात मोलगाई आहे की काय अशी परिस्थिती या घटनेतून दिसून येते.

# सभेतून बोलण्यापेक्षा कार्यकर्त्यांचे काम बोलले पाहिजे

प्रतिनिधी
■ पनवेल

स्टेजवर भाषण करुन बोलण्यापेक्षा कार्यकर्त्यांने आपल्या भागात प्रत्यक्ष कामे करावी. चांगल्या कामाच्या बळावर लोकांची मने जिंकावी. लोकांना मदत करुन चांगले कार्य, कर्तृत्व घडवावे. लोकांचे निस्वार्थ कामे करावी. त्यामुळे कार्यकर्त्यांनी भाषण जरुर करावे, मात्र त्यासोबत कार्यकर्त्याचे काम बोलले पाहिजे.

दिवंगत अंकुश गायकवाड हे सभेत भाषण करुन बोलत नव्हते मात्र त्यांनी अनेकांना केलेली मदत, केलेले कार्य कर्तृत्व त्यांनी केलेले काम आजही त्यांच्या कर्तृत्वाची




महती सांगत आहे. असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले. रिपब्लिकन पक्षाचे डोंबीवली शहर अध्यक्ष दिवंगत अंकुश गायकवाड यांच्या जाहीर श्रध्दांजली सभेत ना. रामदास आठवले बोलत होते.

## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय ०२२ - २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.५४७/५४९/२०२४ दिनांक: १०/१०/२०२४

**पनवेल ई-निविदा मागविणेकामी**

पनवेल महानगरपालिकेत तक्रार निवारण करीता संकेतस्थळ तयार करणेबाबत. (१+४ वर्षाकरीता) या कामाची ई-निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल कडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील https://mahaternders.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे. संबंधित निविदाधारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

पमपा/मातंवि/३०२४/प्र.क्र.१६ / ४८४/२२४-२५
दिनांक: १०/१०/२०२४
मुदत: १५ दिवस

सही /-
(कैलास गावडे)
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका

संदर्भ :- जा.क्र. पमपा/ मातंवि / ३०२४/प्र.क्र. १६/४८४ / २०२४
दिनांक: १०/१०/२०२४

## बृहन्मुंबई महानगरपालिका
सार्वजनिक आरोग्य विभाग
कस्तुरबा हॉस्पिटल साने गुरुजी मार्ग, मुंबई ४०००११
क्र. एचओ /६०../ केएच दि. ४/१०/२०२४

**ई-निविदा सूचना**

बृमनपाचे महानगरपालिका आयुक्तांसाठी आणि त्यांच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक कस्तुरबा हॉस्पिटलद्वारे खाली नमूद करण्यात कामासाठी ऑन लाईन ई-निविदा मागवित आहेत.

| अनु. क्र. | निविदा आयडी | बाबीचे वर्णन | परिमाण |
|---|---|---|---|
| १ | २०२४_ एमसीजीएम_१११३४३_१ | टोटल न्यूक्लेईक ॲसिड ऑटोमेटेड एक्सट्रक्शन कीट च्या पुरवठ्यासाठी निविदा | परिमाण देयकानुसार (बीओक्यू) |

बोली सुरु: ११.१०.२०२४ रोजी १०:०० वा. बोली समाप्ती: १७.१०.२०२४ रोजी १६:०० वा.
संपर्क अधिकारी: डॉ. चंद्रकांत पी. पवार, वैद्यकीय अधीक्षक, कस्तुरबा हॉस्पिटल
दूर क्र. ०२२-२३०२७७६९ ई-मेल: ms01kasturba.phd@mcgm.gov.in
बोली योग्य प्रक्रियेने सादर ऑनलाईन सादर कराव्यात.
पूर्ण ई-निविदा कागदपत्रे महाटेंडर पोर्टल http://portal.mcgm.gov.in वर उपलब्ध आहे.

पीआरओ/१६६०/जाही/२०२४-२५

सही/-
